पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०९/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **१८/०९/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
३. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
४. मा.चोंधे आरती सुरेश
५. मा.मुंढे उषा अंकुश
६. मा.कुटे निर्मला संजय
७. मा.वैशाली जालिंदर काळभोर
८. मा.मिनल विशाल यादव

या शिवाय मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहादरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, मा.शेख – उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) सभा आयोजनाबाबत – मा. आरती चोंधे, मा. उषा मुंढे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) बालवाडयातील मुलांना पोषक आहार देणेबाबत. – मा. निर्मला कुटे, मा. स्वाती काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) सन २०१८-२०१९ या वर्षाच्या महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या कामाबाबत – मा. आरती चोंधे, मा. उषा मुंढे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४) सन २०१८-२०१९ या वर्षाच्या महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या कामाबाबत – मा. आरती चोंधे, मा. उषा मुंढे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) सन २०१८-२०१९ या वर्षाच्या महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या कामाबाबत – मा. आरती चोंधे, मा. उषा मुंढे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) बालवाडयांच्या भिंती थ्रीडी प्रिंटींगद्वारे बोलक्या करणेबाबत – मा. निर्मला कुटे, मा. मिनल यादव यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) १४ नोव्हेंबर २०१८ बालदिन निमित्त बालजत्रेचे आयोजन करणेबाबत – मा. आरती चौंधे, मा. हिराबाई घुले यांचा प्रस्ताव

विषय क्र.८) बालवाडयातील शिशु/बालकांना स्वच्छता किट देणेबाबत – मा. आरती चौंधे, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

----------

दिनांक ०४/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.आरती चौंधे अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.आरती चौंधे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती सभेने त्यांची दर बुधवारी दुपारी २.०० वाजता होणारी साप्ताहिक सभा दर मंगळवारी दुपारी २.०० वाजता आयोजित करणेबाबत ठराव मंजूर केलेला असल्याने मा. महिला बाल कल्याण समितीची प्रत्येक महिन्याचे पहिल्या व तिस-या मंगळवारी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात येणारी सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या व तिस-या बुधवारी दुपारी ३.०० वाजता आयोजित करणेकामी मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.निर्मला कुटे अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा. निर्मला कुटे, मा. स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

महानगरपालिकेच्या सर्व बालवाड्यांमधील मुलांना अन्नमित्र फाउंडेशन व सह्याद्री आदिवासी महिला प्रतिष्ठान या दोन संस्थांमार्फत पोषक आहार देणेस व पोषक आहार वाटप करणे, आहारावर गुणवत्ता नियंत्रण करणे इत्यादी कामे शिक्षण मंडळ विभागामार्फत करण्यास व याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरीवस्ती विकास योजना विभागाने उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - ०३

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.आरती चोंधे अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.आरती चोंधे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

''महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम'' या योजनेच्या कामासंबंधित यापूर्वीचा मा.स्थायी समिती सभेचा १) ठराव क्रमांक २५८३, दिनांक १८/०४/२०१८ हा ठराव रद्द करणेस तसेच सन २०१८-२०१९ या वर्षाच्या सदर योजनेच्या कामासंबंधीतचा २) ठराव क्रमांक २६१२, दिनांक २५/०४/२०१८ या मधील पहिला परिच्छेद म्हणजेच ''नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजने अंतर्गत प्रसिध्द केलेली ई-निविदा रद्द करुन नवीन कोर्सेस सुरु करणे या विषयाबाबत ई-निविदा नोटीस क्रमांक ०१/२०१८/१९ ही प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेचा स्विकृत कालावधी दिनांक ०९/०४/२०१८ ते ०७/०५/२०१८ पर्यंत आहे. तथापि, ही संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. हा परिच्छेद (मजकूर) कायम ठेऊन या ठरावातील पुढील सर्व मजकुर रद्द करणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे''. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ०४

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.आरती चोंधे अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.आरती चोंधे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

''महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम'' या योजनेच्या कामासंबंधित यापूर्वीचा मा.महिला व बालकल्याण समिती सभेचा ठराव क्रमांक १०, दिनांक ०४/०९/२०१८ मध्ये ''सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी''. या ऐवजी ''सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदरचा ठराव मा.स्थायी समितीसभेकडे मान्यतेकामी पाठविण्यास शिफारस करणेत येत आहे''.हा मजकुर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे. यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ०५

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.आरती चोंधे अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.आरती चोंधे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

''महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम'' या योजनेच्या कामासंबंधित यापूर्वीचा मा.महिला व बालकल्याण समिती सभेचा ठराव क्रमांक ९, दिनांक ०४/०९/२०१८ मधील ''सन २०१८-१९ या वर्षाच्या ''महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम'' या योजनेच्या कामासंबंधित

यापूर्वी मा.महिला बाल कल्याण समितीसभेने'' या ठरावाच्या वाक्यातील 'समितीसभेने' या शब्दा ऐवजी 'समितीसभेचे' अशी दुरुस्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ०६

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.निर्मला कुटे अनुमोदक : मा.मिनल यादव

संदर्भ : मा.निर्मला कुटे, मा. मिनल यादव यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील सर्व बालवाड्यांच्या भिंती ३डी (3D) पेटींगद्वारे बोलक्या करणेस व सदरचा उपक्रम पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून करणेस व त्याकामी येणा-या खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाने करण्यास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ०७

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.आरती चौंधे अनुमोदक : मा.हिराबाई घुले

संदर्भ : मा.आरती चौंधे, मा. हिराबाई घुले यांचा प्रस्ताव –

१४ नोव्हेंबर २०१८ बालदिन निमित्त बालजत्रेचे आयोजन अनुक्रमे १३ व १४ नोव्हेंबर या दोन्ही दिवशी सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदान व भोसरी येथील गाव जत्रा मैदान या दोन्ही ठिकाणी करण्यात यावे. या बालजत्रेमध्ये लहान मुलांची खेळणी व विविध मनोरंजनाचे खेळ तसेच खाऊ वाटप करण्यात यावे. तसेच मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन व बक्षीस वाटप करण्यात यावे. तसेच पालकांसाठी प्रबोधनपर मुलांचे आरोग्य व आहार या विषयी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे. तरी याची कार्यवाही नागर वस्ती विकास योजना विभागाच्या वतीने करण्यात यावी. सदर कामाची प्रचार प्रसिध्दी व आमंत्रण देण्याची कार्यवाही माहिती व जनसपर्क विभागाच्या वतीने करणेकामी मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक - ०८

दिनांक – १८/०९/२०१८

सुचक : मा.आरती चौंधे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.आरती चौंधे, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

महापालिकेचे प्राथमिक शिक्षण विभागाकडील बालवाड्यातील शिशु / बालकांना स्वच्छता कीट साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्रमांक क्रमांक 22/2017-2018 अन्वये लघुत्तम निविदाकार मे. प्लेमेक्स कार्पोरेशन, ठाणे यांचे प्रती कीट रक्कम रुपये 720/- याप्रमाणे कामाचे आदेश देणेत आले होते. सदर कामाची मुदत संपली आहे. सदर ठेकेदार जुन्या दराने चालू वर्षी स्वच्छता कीटचा पुरवठा करणेस तयार असलेने सन 2018-2019 या आर्थिक वर्षाकरिता प्रती त्रैमासिक स्वच्छता कीट पुरविण्याचे अटीसह पूर्वीच्या मंजूर दरानुसार (रक्कम रुपये 720/- प्रती कीट) मे. प्लेमेक्स कार्पोरेशन, ठाणे यांचेकडून स्वच्छता कीट खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६११/२०१८
दिनांक : १९/०९/२०१८

(महमदशब्बीर बाबूलाल शेख)
**उपनगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.